# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( शिक्षण विभाग )

जा.क्र. / 1942/ शि.वि. दि. 30/05/2014

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
म.न.पा., माध्य. शाळा,
म.न.पा. नागपूर

**विषय :— शाळेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी व सुरक्षा रक्षक यांनी शाळेची सुरक्षा करण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपणांस सुचित करण्यात येते की, बऱ्याच शाळेत साहित्य चोरी प्रकरणाबाबत कार्यालयास तक्रारी प्राप्त होत आहे. कार्यालयामार्फत प्रत्येक शाळेत 3 सुरक्षा रक्षक देणे शक्य नसल्यामुळे आपल्या शाळेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी व सुरक्षा रक्षक यांच्यावर शाळा सुरक्षिततेची (24 तास) जबाबदारी सोपविण्याबाबत नियोजन करण्यात यावे. व त्यानुसार चतुर्थ श्रेणी कर्मचारी व सुरक्षा रक्षक यांची पाळी लावावी.

ज्या चतुर्थ श्रेणी कर्मचारी व सुरक्षा रक्षक यांच्या पाळीत शाळेतील साहित्याची चोरी अथवा नासधुस झाल्यास अशा चतुर्थ श्रेणी कर्मचारी व सुरक्षा रक्षक यांना जबाबदार धरण्यात येऊन चोरी गेलेल्या साहित्याची रक्कम वसुल करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.या कार्याबाबत संबंधीत कर्मचारी यांना अवगत करून त्यांची शालेय सुरक्षा व कर्तव्याबाबत नियोजन करावे. केलेल्या नियोजनाचा अहवाल सहा.शिक्षणाधिकारी यांच्याकडे सादर करावा.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी :—

1) मा. उपायुक्त, म.न.पा., नागपूर.
2) सहा. शिक्षणाधिकारी, म.न.पा., नागपूर यांना योग्य कार्यवाहीस्तव.